# मान्यताप्राप्त विना अनुदानित/ अनुदानित खाजगी प्राथमिक शाळांमधील नैसर्गिक वाढीचे प्रथम वर्ग मंजूरीबाबत.

**१ शासन निर्णय क्रमांक व्हिएलएस१०९६/५०१/९९/प्राशि-३ दि.८.७.२००५**
**२.शासन निर्णय क्रमांक व्हीएलएस १०९६/५०१/९९/प्राशि-३ दिनांक २०.१२.१९९६**
**३. शासन निर्णय क्रमांक एसएसएन-१०९७/५२९/८८/माशि-१ दि.१.३.१९९९**
**४. शासन पत्र क्रमाक व्हीएलएस १०००/७४३/००/ प्राशि-३ दिनांक १३.२.२००१**

**www.maharashtra.gov.in**

**मान्यताप्राप्त विनाअनुदानीत/अनुदानित खाजगी प्राथमिक शाळांमधील नैसर्गिक वाढीचे प्रथम वर्ग मंजूरीबाबत.**

मान्यताप्राप्त विनाअनुदानित खाजगी प्राथमिक शाळांमधील नैसर्गिक वाढीचे प्रथम वर्ग मंजूर करण्याचे अधिकार या कार्यालयास आहेत. यामध्ये शाळेस इ. १ ली चा वर्ग मंजूर करण्यांत आल्यानंतर त्यापुढील इयत्ता २ री ते ४ थी पर्यंतचे नैसर्गिक वाढीचे प्रथम वर्ग मंजूर केले जातात.

त्याचप्रमाणे शाळेस इ. ५ वी चे नैसर्गिक वाढीचे वर्गास शासनाकडून मंजूरी मिळाल्यानंतर त्या शाळेतील इ. ६ वी व इ. ७ वी नैसर्गिक वाढीचे वर्ग या कार्यालयाचे स्तरावरुन मंजूर केले जातात.

इयत्ता ५ वी चे नैसर्गिक वाढीचे प्रथम वर्ग मंजूर करण्याचे प्रस्ताव शासन निर्णय दिनांक २.१२.१९९६ व दिनांक १.१.१९९६ मधील निर्णयातील अटी व शर्तीनुसार या कार्यालयाच्या स्तरावरुन तपासून शासनास सादर केले जातात.

खाजगी अनुदानित/ विना अनुदानित प्राथमिक शाळेतील इ. २ री ते ७ वी पर्यंतचे अतिरिक्त तुकडयांचे नैसर्गिक वाढीचे प्रस्तावाची छाननी करुन मा. प्राथमिक शिक्षण संचालनालयाकडे सादर केले जातात.

## सदर प्रस्ताव सादर करतांना खाली नमूद केलेले कागदपत्र आवश्यक आहेत.

१. शाळेची मूळ शासन परवानगीची प्रत
२. मागणी केलेल्या वर्ग/ तुकडीची मागील वर्षाची वर्ग तुकडीची मंजूरीची प्रत
३. शाळेच्या कार्यक्षेत्रानुसार इ. ५ वी (प्रथम) बाबत जिल्हा परिषद शिक्षण समितीचा ठराव/ नगरपालिका/ महानगरपालिकेचे नाहरकत प्रमाणपत्र.

अ)

## कायम विनाअनुदान तत्वावरील शासन मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीचे वर्ग/ अतिरिक्त तुकडया मंजूर करण्याबाबत

### १. शासन निर्णय क्रमांक व्हीएलएस/१००२/१०००/०२/प्राशि-३ दिनांक २१.९.२००३

www.maharashtra.gov.in

**कायम विनाअनुदान तत्वावरील शासन मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीचे वर्ग/ अतिरिक्त तुकडया मंजूर करण्याबाबत.**

कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यांत आलेल्या शाळांना (इंग्रजी माध्यम व्यतिरिक्त) इंयत्ता पहिलीच्या प्रथम वर्गास परवानगी दिल्यानंतर त्याच तत्वावर अशा शाळांना आवश्यकतेनुसार इ. २ री ते ७ वी पर्यंतचे नैसर्गिक वाढीचे वर्ग तसेच अतिरिक्त तुकडया मंजूर करण्याचे अधिकार संबंधित जिल्हयामध्ये शिक्षणाधिकारी (प्राथमिक) तसेच महानगरपालिका शिक्षण मंडळ कार्यक्षेत्रातील शाळांचे बाबत शिक्षण प्रमुख/ प्रशासन अधिकारी यांना आहेत. त्यानुसार त्यांचे कार्यालयाकडून अशा शाळांचे वर्ग व तुकउया मंजूर केल्या जातात